V J T I
Veermata Jijabai Technological Institute
(Central Technological Institute, Maharashtra State, INDIA)
H. R. Mahajani Marg, Matunga, Mumbai 400019
Tel.No. +91 22 24198100 Fax: +91 22 24102874
www.vjti.ac.in

6 SEP 2019

क्र.लेखा/शिवृ/पं.दि.उ.स्वयम् योजना/२०१९-२०/३५७/२०१९ दिनांक :०६.०९.२०१९

## शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संस्थेतील फक्त प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या (ST) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर परिपकाद्वारे सूचित करण्यात येते की, शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या तसेच भाडे तत्वावर राहत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहातील मुलां-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहीत्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांकरीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना शासनाने सुरू केलेली आहे. सदर योजने अंतर्गत प्रति वर्षी ६०,०००/- इतकी रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बॅक खात्यात थेट शासनामार्फत जमा केली जाईल. सदर योजनेकरीता विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २,५०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे बंधनकारक आहे.

तरी सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता विद्यार्थ्यांनी स्वत: https://swayam.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा व सदर ऑनलाईन भरलेला अर्ज व संबंधीत कागदपत्र त्वरीत शिष्यवृत्ती विभागात आणून द्यावयाचे आहेत. तसे न केल्यास आपण या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जवाबदारी विद्यार्थी व पालकांची राहील याची गांभीयाने नोंद घ्यावी.

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA, MUMBAI-19.

अध्यक्ष
शिष्यवृत्ती समिती

टीप :

१. व्ही.जे.टी.आय. वसतीगृहातील विद्यार्थीसुध्दा या योजनेस पात्र राहतील.
२. M.Tech. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जर विद्या वेतन (Stipend) मिळत नसेल तरच ते या योजनेस पात्र राहतील.
३. SC / OBC / SBC / VJ-NT / OPEN / Minority प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी या योजनेस पात्र नसल्याने त्यांनी अर्ज करू नये.

प्रत : सर्व विभागप्रमुख, सुचना फलक, वसतीगृह,
ग्रंथालय, टिपीओ, संस्थेचे संकेतस्थळ